# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

## परिपत्रक

महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६, कलम २८(२)(द) अन्वये महाविद्यालयीन/परिसंस्थांतील १० अध्यापक आणि कलम २८(२)(ध) अन्वये ०३ विद्यापीठ अध्यापक अधिसभेवर तसेच कलम ३२(३)(छ) अन्वये प्रत्येक विद्याशाखेचे ०२ अध्यापक विद्यापरिषदेवर व ४०(२)(ग) अन्वये महाविद्यालयीन/परिसंस्थांतील ०३ विभागप्रमुख प्रत्येक अभ्यासमंडळावर निवडून द्यावयाच्या सदस्य पदांची निवडणूक रविवार, दिनांक ८ जानेवारी, २०२३ रोजी, सकाळी १०.०० ते सांयकाळी ५.०० वाजेपर्यंत एकूण ४५ मतदान केंद्रांवर घेण्यात येणार आहे. तसेच सदर निवडणुकीची मतमोजणी मंगळवार, दिनांक १० जानेवारी, २०२३ रोजी होणार आहे.

मतदानाच्या दिवशी उक्त निवडणुकीच्या उमेदवारांना मतदान केंद्रांवर प्रवेश करण्यासाठी व मतमोजणीच्या वेळी उपस्थित राहण्यासाठी विद्यापीठाच्या निवडणूक विभागाकडून ओळखपत्र देण्यात येणार आहे.

त्याचप्रमाणे विविध मतदान केंद्रांवर उमेदवारांचे मतदान प्रतिनिधी म्हणून काम करणा-या व्यक्तिसाठी या परिपत्रकास जोडलेल्या नमुन्याप्रमाणे भरुन केंद्राध्यक्षाकडे सादर करावयाचा आहे. परंतु उमेदवारांचे प्रतिनिधी म्हणून काम करणारी व्यक्ती ही संबंधित मतदार यादीतील मतदार असणे आवश्यक आहे.

तसेच मतमोजणीच्या वेळी स्वतः उमेदवार किंवा उमेदवाराने लेखी अधिकार पत्र दिलेले, त्याच मतदार यादीतील मतदार असणारे त्यांचे प्रतिनिधी किमान एक तास अगोदर पूर्वसूचना देऊन निवडणूक विभागामार्फत देण्यात आलेले ओळखपत्र दाखवून उपस्थित राहू शकतात.

गणेशखिंड, पुणे ४११ ००७
संदर्भ क्र. : साफुपुविनि/०२
दिनांक : ०२ जानेवारी, २०२३

(डॉ. प्रफुल्ल पवार)
कुलसचिव

# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

निवडणूक - २०२२

मतदान प्रतिनिधीची नेमणूक

..................................................ची निवडणूक

वरील निवडणुकीतील उमेदवार (उमेदवाराचे नाव व पत्ता) ----------------------------------------
---------------------------------------------------------------------------------------------------------------- यांचा
याद्वारे श्री./श्रीमती ------------------------------------------ यांची (मतदान यादीतील क्रमांक -----------)
मतदान केंद्र क्रमांक ------------ येथे / मतदानासाठी निश्चित केलेली जागा ---------------------------
येथे ---------------- वाजता हजर राहण्याकरीता मतदान प्रतिनिधी म्हणून नेमणूक करीत आहे.

ठिकाण :

------------------------------------

दिनांक : उमेदवाराचे नाव व सही

मी मतदान प्रतिनिधी म्हणून काम करण्याचे कबूल करतो.

ठिकाण :

------------------------------------

दिनांक : मतदान प्रतिनिधीचे नाव व सही

D:\Election 2022 (Bhosale)\Teacher\Circular.docx